जनमानसावर अधिराज्य गाजवणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करताना प्रत्येक शिवप्रेमी भारावलेला असतो. अर्थात ते भारावलेपण केवळ एका दिवसापुरते नसते. राजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या गड-किल्ल्यांवर पाऊल ठेवताना, त्यांच्या नावाचा गजर करताना, त्यांच्या आयुष्यातील प्रसंग ऐकताना ते जाणवते आणि आपण या महान इतिहासपुरूषापुढे नतमस्तक होतो. भारावलेल्या मनाने त्यांचा महिमा गातो...

# राजांचे आठवता रूप

विशेष लेख

उर्मिला राजोपाध्ये



राजेशाही असण्याच्या काळात भारताने अनेक राजे पाहिले. त्यांचा अंमल अनुभवला. इतिहासाने त्या त्या काळातील राजांची नोंद घेतली. आजही ठिकठिकाणच्या संग्रहालयांमध्ये राजेरजवाड्यांची तत्कालीन चित्रकारांनी चितारलेली चित्रे, संदर्भ, बखरी वा अन्य साहित्यांतून मिळणारे संदर्भ समोर येतात आणि त्या काळात डोकावण्याची संधी मिळते. मात्र शिवाजी राजांचे नाव निघते तेव्हा इतिहासाबरोबरच वर्तमानाशीही संबंध जोडला जातो. अशाप्रकारे दोन्ही काळांशी तादात्म्य पावणारा हा एकमेव राजा असावा... त्यामुळेच आजही शिवरायांची जयंती साजरी करताना त्यांचे बाळरूप पाळण्यात जोजावताना लडीवाळ पाळणा गाताना, मिरवणूका काढून त्यांचा जन्मोत्सव साजरा करताना प्रत्येकाच्या भावनांना उधाण येते. या मागे जाणत्या राजाला अभिवादन करण्याचे प्रयोजन असतेच. त्याच बरोबरीने जनमनावर आजही राज्य करणाऱ्या आवडत्या राजाप्रतिचे प्रेम असते. हा सोहळा हृद्य होण्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. प्रजापालक, मुलगा, पती, पिता, कडवा प्रतिस्पर्धी अशी त्यांची एक ना अनेक रूपे आजही जगण्याचे आणि जगवण्याचे धडे देऊन जातात. जयंतीच्या निमित्ताने राजांना मानाचा मुजरा करण्याची संधी समाधान देऊन जाते.

याचे कारण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एका साम्राज्याचे संस्थापक नव्हते, तर ते एका आदर्श नेतृत्वाचे प्रतीक होते. त्यामुळे त्यांचे विचार आणि कार्यांचे महत्त्व केवळ इतिहासापुरते मर्यादित नाही तर ते आजही प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहेत. सध्याच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थितीत त्यांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. राजांचे नेतृत्व आणि ध्येयधोरणे पाहता ते दूरदृष्टीचे आणि आदर्शवादी राजे होते. त्यांनी स्वराज्य हा संकल्प उभा केला आणि त्यासाठी अपार परिश्रम घेतले. आजच्या काळात, विशेषतः तरुणांना नेतृत्वगुण आत्मसात करण्यासाठी आणि स्वतःचे ध्येय गाठण्यासाठी महाराजांच्या या जिद्दीचा आदर्श घेता येईल.

दुसरी बाब सामाजिक समता आणि न्यायाची आहे. शिवाजी महाराजांनी त्यांच्या राज्यात जात-पात, धर्मभेद न मानता सर्वांना समान न्याय दिला. त्यांनी हदू-मुस्लिम एकतेचा आदर्श घालून दिला. आजच्या काळात जातीयतेच्या आणि धार्मिक द्वेषाच्या पार्श्वभूमीवर, त्यांचे विचार सामाजिक सलोख्यासाठी मार्गदर्शक ठरू शकतात. महिलांचा सन्मान आणि सुरक्षितता हा आज ऐरणीवर आलेला मुद्दा आहे. या पार्श्वभूमीवर पाहता शिवाजी महाराजांनी आपल्या सैन्यात महिलांसाठी स्वतंत्र संरक्षण यंत्रणा उभारली होती. स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्यांना त्यांनी कठोर शासन केले. ते बघता आजच्या समाजात महिलांच्या सुरक्षिततेबाबत वाढत्या समस्यांसाठी त्यांचे विचार आणि धोरणे प्रेरणादायी ठरू शकतात. आत्मनिर्भरता आणि स्वावलंबन प्रत्येक काळात महत्त्वाची असतेच. शिवाजी महाराजांनी स्वराज्यासाठी स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था आणि जलदुर्ग, गडकोट यांची मजबूत व्यवस्था निर्माण केली. आजच्या आर्थिक संकटांच्या काळात 'मेक इन इंडिया' आणि स्वदेशी उत्पादनांना चालना देण्यासाठी त्यांचा हा आदर्श उपयुक्त ठरणारा आहे. खेरीज राजांनी शिस्त आणि युद्धनीतीचेही कालातीत धडे दिले आहेत. त्यामुळेच त्यांचा गनिमी कावा आणि गुप्तचर यंत्रणा आजच्या संरक्षण आणि धोरणात्मक व्यवस्थेसाठीही अत्यंत महत्त्वाची ठरू शकते. त्यांच्या शिस्तप्रियतेचा आदर्श आजच्या प्रशासकीय व्यवस्थेसाठीही प्रेरणादायी आहे.

पर्यावरण आणि त्याच्या रक्षणासंबंधीचे प्रश्नदेखील आज भेसूर रुप घेत आहेत. त्याकडे दुर्लक्ष केल्यास संपूर्ण निसर्गचक्रच धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळेच पर्यावरणसंवर्धन आणि गडसंवर्धनासाठी महाराजांनी घेतलेले निर्णय आजही अभ्यासण्याजोगे ठरतात. शिवाजी महाराजांनी गडदुर्गांच्या संवर्धनावर विशेष भर दिला. आजही त्यांचे गडदुर्ग आपल्या ऐतिहासिक वारशाचा भाग आहेत. तेव्हा त्यांचे संरक्षण करणे आणि पर्यावरण संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. थोडक्यात, छत्रपती शिवरायांच्या जयंतीनिमित्त केवळ साजरीकरणामध्ये दंग न राहता त्यांच्या विचारांनुसार आचरण करण्याचा प्रयत्न केला तर त्यांना अपेक्षित असणारा समाज आपण घडवू शकतो.

आज महाराष्ट्रातल्या प्रत्येक माणसाच्या मनात या वीरपुरुषाच्या कथांमधून मिळालेले वीरश्रीचे बाळकडू पाझरले आहे. त्यांच्या जीवितकार्यातल्या प्रत्येक तेजोमय प्रसंगाने आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यातला कोपरा उजळला आहे. आपल्याला रणाचा परिचय नाही पण राजांची रणनीती मात्र आयुष्यातल्या बारीकसारिक प्रसंगांमध्येही मार्गदर्शक ठरते. आता कोणी शाहिस्तेखान, अफझलखान आपल्यावर चालून येणार नाही पण त्यांच्या कथा ऐकून मोठे झाल्यामुळे गोड बोलून पाठीत वार करु शकणाऱ्या प्रत्येक शत्रूप्रती आपण सजग आहोत. शिवसाम्राज्यानंतर काही शतकांचा काळ उलटला असला तरी आजही प्रचंड उत्साहात आणि दिमाखात शिवरायांची जयंती साजरी होणे आणि प्रत्येक पिढीने तेवढ्याच आनंदाने त्याचा भाग होण्याचा प्रयत्न करणे हाच या व्यक्तिमत्त्वाचा गौरव आहे.

राजांबद्दल आपल्या प्रत्येकाच्या मनात प्रेमाबरोबरच भक्तीही आहे. ही भक्ती तो प्रतिपालक, धनी, नेता, धूरधंर असल्याबद्दल आहेच पण त्याहीपेक्षा अधिक त्याने अखंड जनकल्याणाचा विचार केल्यामुळे आहे. याच जनांच्या कल्याणासाठी मिसरुडे फुटायच्या वयापासून वृद्धत्वाची साद ऐकू येण्याच्या वयापर्यंत त्यांनी अनंत संकटांचा सामना केला. आपल्या मावळ्यांना प्राणपणाने जपले. प्रजेवर पूत्रवत प्रेम केले. म्हणूनच त्यांचे तख्त इतिहासजमा झाले तरी छत्रपती महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीच्या मनावर आरुढ आहेत. त्यांच्याप्रती असणारे मनामनातले प्रेम तसूभरही कमी झालेले नाही. स्वराज्य आणि शिवराय हे अद्वैत महाराष्ट्राच्या ललाटावरील टिळ्यासम आहे. आजही कोणताही गड चढताना इथे शिवप्रभूंची पायधूळ झडली असेल, या विचाराने प्रत्येकजण भारावून जातो. रायगडावरील शिवरायांच्या प्रतिमा दृष्टीस पडताच डोळे भरुन येतात, समाधीचे दर्शन घेताना प्रत्येकजण भावूक होतो. शिवरायांचा असा महिमा असल्यामुळेच महाराष्ट्राची मातीदेखील त्यांची जयंती साजरी करते.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे शिवप्रभूंच्या चरित्रातून घेण्यासारखे खूप काही आहे. कबहुना, प्रत्येक त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक अध्यायच अभ्यासण्याजोगा आहे. मावळे आणि सह्याद्री यांची साथ असल्याशिवाय संघर्ष सफल होणार नाही हे या द्रष्ट्याने आधीच ओळखले होते. यातूनच शिबवांना गडकोटाच्या अभ्यासाची आणि सामान्यजनांचे सुखदु:ख जाणून घेण्याची प्रेरणा मिळाली. आदिलशाही सत्तेने आक्रमण करुन शहाजीराजांच्या जहागिरी बेचिराख केली. आधी गाढवाचा नांगर फिरवलेल्या पुण्याच्या भूमीवर जिजाऊने बारा वर्षांच्या शिवबांच्या हस्ते सोन्याचा नांगर फिरवला आणि एका सुवर्णकाळाचा आरंभ झाला. शिवबाने यवनांनी उद्धवस्त केलेल्या कसबा गणपती मंदिराचा जीर्णोद्धार केला. एका नव्या युगाला, आरंभाला गणेशाचे आशीर्वाद मिळाले. दुसरीकडे, शिवबांनी उद्धवस्त जहागिरीची पुनर्रचना करण्यास सुरुवात केली. त्यांनी देशमुख-देशपांडे या वतनदारांच्या माध्यमातून रयतेशी संपर्क साधला आणि पुनर्वसाहतीसाठी नागरिकांचे सहकार्य मागितले. पण जनता अस्मानी आणि सुलतानी संकटाने ग्रासलेली होती. त्यांच्याकडे घालायला कपडा, पोटाला घास, दावणीला बैल आणि राहण्यासाठी निवारा नव्हता. जमीन पडीक पडली होती. ही विदारक अवस्था जाणल्यानंतर शिवबाने प्रत्येकाला गरज असेल तशी मदत करण्याचे जाहीर केलं. अवजारे नसतील त्यांना अवजारे दिली, अन्नाचा घास नसणाऱ्यांना खंडी-दोन खंडी धान्य दिले, शेतीच्या कामासाठी बैल नसणाऱ्यांनी ती मदत देऊ केली. अशा प्रकारे त्यांनी रयतेची मूलभूत प्रश्नांपासून सुटका केली.

✦✦✦

---

दिल्ली विधानसभेच्या निवडणूक निकालानंतर भारतीय जनता पक्षाने काँग्रेसचा इंदिरा गांधी यांच्या काळातील सर्वाधिक राज्ये जिंकण्याचा विक्रम मोडीत काढला आहे. १९ राज्ये आणि बहुतांश केंद्रशासित प्रदेशात भाजप सत्तेवर आहे. काँग्रेसची वाताहात झाली असली, तरी पुढच्या काही वर्षांच्या राजकारणाचा विचार केला, तर देशात द्विपक्षीय राजकारण पुन्हा आकार घेण्याची शक्यता आहे.

# द्विपक्षीय राजकारणाच्या दिशेने



प्रमोद मुजुमदार

ज्येष्ठ पत्रकार, नवी दिल्ली

हरियाणा आणि महाराष्ट्रातील प्रचंड विजयानंतर भारतीय जनता पक्षाने दिल्लीमध्येही आपली विजयगाथा सुरू ठेवली. दिल्लीची निवडणूक हरियाणा आणि महाराष्ट्रापेक्षा खूपच गुंतागुंतीची होती. गेल्या तीन लोकसभा निवडणुकींमध्ये भाजपने दिल्लीत सातही जागा जिंकल्या होत्या; परंतु विधानसभा निवडणुकीत जनता भाजपला नाकारत होती. लोकसभा निवडणुकीत काँग्रेस आणि 'आप' एकत्र येऊनही भाजपला शह देऊ शकले नाहीत. हरियाणाच्या निवडणुकीत 'आप' आणि काँग्रेसचे सूत जमले नाही. हरियाणामध्ये 'आप'ची जी परिस्थिती झाली, तीच दिल्लीमध्ये काँग्रेसची झाली. गेल्या तीन विधानसभा निवडणुकांमध्ये आम आदमी पक्षाचा झाडू कमळ साफ करत होता; परंतु आता मात्र कमळाने झाडू साफ केला आहे. भाजपला केवळ 'आप'हाच पर्याय आहे, असे चित्र तयार करण्यात येत होते. काँग्रेससह अन्य राजकीय पक्षांना 'आप'कस्पटासमान मानत होता. अखेर भाजपने दिल्लीच्या निवडणुकीत 'आप'चा तोरा उतरवला. 'आप'चे संयोजक अरविंद केजरीवाल, माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यासह अनेक नेते पराभूत झाले. आम आदमी पक्षाच्या सरकारच्या मोफत योजनांसमोर भाजपला यश मिळवणे कठीणच नाही, तर अशक्य वाटत होते; परंतु भाजपने अशक्य ते शक्य केले. गेल्या वर्षी झारखंडमध्ये हेमंत सोरेन यांनी भाजपचा पराभव केला. लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर राजकीय वर्तुळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रियतेत घट सुरू झाली आहे, असे मानले जात होते. लोक काँग्रेस आणि राहुल गांधींबद्दल जास्त आशावादी होऊ लागले होते, मात्र भाजप दिल्लीत ठसा उमटवण्यात यशस्वी झाला आणि नरेंद्र मोदी यांना पर्याय नसल्यावर शिक्कामोर्तब झाले.



लोकसभेत मोदी यांनी आपल्याला देशाची सेवा करण्यासाठी अजूनही बरीच वर्षे आहेत, असे संकेत दिले होते. त्यांच्या विधानावरून असे सूचित होते की २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे नेतृत्व ते करू शकतात. दिल्ली विधानसभा जिंकल्यामुळे भारतीय जनता पक्षातील कोणीही त्यांना आव्हान देण्याचे धाडस करणार नाही. उलट, मोदी यांच्यासारख्या निवडणूक जिंकणाऱ्या नेत्याला सध्या निवृत्त न करणे, ही पक्षाची गरज असेल. अलिकडच्या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपमधील अंतर वाढले होते. सरकारवर संघाचा हस्तक्षेप वाढू शकतो, असे चित्र होते; परंतु दिल्लीतील विजयामुळे मोदी पुन्हा एकदा इतके बलवान झाले आहेत, की कोणत्याही संघटनेला त्यांना आव्हान देणे आता शक्य नाही. लोकसभा निवडणुकीतील कामगिरीमुळे काँग्रेसचा फाजील आत्मविश्वास वाढला होता. भाजपच्या कमकुवत कामगिरीनंतर आपण एकटेच मोदी सरकारचा सामना करू शकतो, असे काँग्रेसला वाटू लागले. यामुळेच 'इंडिया' आघाडीच्या विघटनाची सावली पडू लागली. काँग्रेसच्या अतिउत्साहाचा परिणाम असा झाला, की प्रादेशिक पक्षांना आपल्या अस्तित्वाची चिंता वाटू लागली. समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट, आम आदमी पक्ष यासारख्या पक्षांना काँग्रेसपासून वेगळे राहण्याची गरज वाटू लागली.

दिल्लीत आम आदमी पक्षाच्या पराभवानंतर विरोधकांना पुन्हा एकदा भाजपला एकट्याने हरवणे अशक्य आहे, असे वाटू शकते. मात्र त्यामुळे पुन्हा एकदा 'इंडिया' आघाडीला बळकटी देण्याचे प्रयत्न सुरू होऊ शकतात; पण या वेळी काँग्रेसचे पूर्वीसारखे वर्चस्व राहणार नाही. ज्या ठिकाणी प्रादेशिक पक्षच भाजपला खरे आव्हान देऊ शकतात, तिथे काँग्रेसला दुय्यम भूमिका घ्यावी लागेल, तर जिथे काँग्रेस भाजपला आव्हान देण्याच्या शक्यतेत आहे, तिथे प्रादेशिक पक्षांना सहकार्य करण्याची भूमिका घ्यावी लागेल. जे प्रादेशिक पक्ष काँग्रेसला कमकुवत करतात आणि काँग्रेसचा दुबळेपणा हाच ज्यांच्या वाढीचा मार्ग आहे, त्या पक्षांना रोखण्याची व्यूहनीती आता काँग्रेस आखत आहे. प्रसंगी भाजप जिंकला, तरी चालेल; परंतु प्रादेशिक पक्षांनी कुरघोडी करू नये, असे त्याचे धोरण दिसते. भाजपला नंतर शह देता येईल आणि भाजप-काँग्रेस अशी लढत होईल, असे राजकीय चित्र तयार करता येईल का, याचा काँग्रेस आता विचार करण्याची शक्यता आहे. दिल्ली हातून गेल्यानंतर 'आप'ला आता पंजाबमध्येही आव्हान मिळू शकते. काँग्रेसला दुबळे करून भाजपला पर्याय ठरण्याचा त्याचा मार्ग आता खडतर असेल. प्रादेशिक पक्षांवर मात करण्यासाठी काही ठिकाणी काँग्रेस मजबूत झाली तरी चालेल, अशी भाजपचीही इच्छा आहे.

आम आदमी पक्षाच्या दिल्लीतील पराभवाने पंजाबसारख्या राज्यामध्ये काँग्रेसला पुन्हा एकदा मजबूत होण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. दलित आणि मुस्लिमांची काही मते मिळवण्यात यशस्वी झाल्यास भविष्यात मागासवर्गीयांची मतेही काँग्रेसकडे जाऊ शकतात. अशा प्रकारे, काँग्रेसच्या बळकटीकरणामुळे अनेक प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते. उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पक्ष आणि बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दलासाठीही धोका वाढेल. काँग्रेस येथे मजबूत झाली तरी भाजपला आव्हान देण्याच्या स्थितीमध्ये असणार नाही. झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चा आणि काँग्रेस पुन्हा सत्तेत परतले; पण झारखंडमधील विजयाचे श्रेय झारखंड मुक्ती मोर्चाच्या रणनीतीला देण्यात आले. काही विधानसभा निवडणुकींमध्ये पराभव झाल्यानंतर मध्यंतरी काँग्रेसने दिल्लीत आम आदमी पक्षासोबत युती करण्याचा प्रयत्न केला; परंतु आम आदमी पक्षाने स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. 'इंडिया' आघाडीच्या मित्रपक्षांनी काँग्रेसऐवजी 'आप'चा प्रचार केला. शेवटी काँग्रेसने स्वबळावर निवडणुका लढवल्या आणि आम आदमी पक्ष दिल्लीत सत्तेबाहेर पडला. दिल्लीच्या निवडणुकीत आम आदमी पक्षाचा पराभव अखिल भारतीय आघाडीत काँग्रेसची स्थिती मजबूत करू शकतो. 'इंडिया' आघाडीत समाविष्ट असलेले समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस, राष्ट्रीय जनता दलासारखे प्रादेशिक पक्ष आपल्या राज्यांमध्ये काँग्रेसची स्थिती मजबूत होऊ देऊ इच्छित नाहीत.

बिहार, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि झारखंडसारख्या राज्यांमध्ये काँग्रेस मजबूत होत चालल्याने प्रादेशिक पक्षांना फटका सहन करावा लागू शकतो. कारण काँग्रेसचा मुख्य मतदार मिळवून प्रादेशिक पक्ष अधिक मजबूत झाले आहेत. ही भीती लक्षात घेऊन आम आदमी पक्षाने दिल्लीमध्ये काँग्रेससोबत युती न करण्याचा निर्णय घेतला आणि याचा फटका आम आदमी पक्षाला सहन करावा लागला. दोन्ही पक्षांनी दिल्लीमध्ये एकत्र निवडणूक लढवली असती तर निकाल वेगळा असता. दिल्लीतील आम आदमी पक्षाचा पराभव हा प्रादेशिक पक्षांसाठी मोठा धक्का आहे. आता काँग्रेस हे सांगण्याचा प्रयत्न करेल की, त्यांच्या पाठिंब्याशिवाय प्रादेशिक पक्ष राज्यांमध्ये निवडणुका जिंकू शकत नाहीत. काँग्रेस एकट्याने निवडणुका लढवून सत्ता काबीज करू शकत नसली, तरी प्रादेशिक पक्षांचे समीकरण निश्चितच बिघडवू शकते. दिल्ली निवडणुकीच्या निकालानंतर 'इंडिया' आघाडीबद्दल उपस्थित केले जाणारे प्रश्न कमकुवत होऊ शकतात किंवा प्रादेशिक पक्ष एकत्र येऊन काँग्रेसला कमकुवत करण्याचा प्रयत्न करू शकतात आणि दिल्लीमध्ये भाजपला सत्ता मिळवण्यात यश आल्याबद्दल काँग्रेस जबाबदार असल्याचा आरोप करू शकतात.

सध्याच्या राजकीय परिस्थितीत भाजपच्या बळकटीकरणामुळे पुन्हा एकदा 'इंडिया' आघाडीतील घटक पक्षांमध्ये एकी वाढण्याची दाट शक्यता आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीमध्ये शून्याची हॅटट्रिक केली असली, तरी काँग्रेस इतर राज्यांमध्येही आपले उपद्रवमूल्य सिध्द करु शकते. त्यामुळे प्रादेशिक पक्ष विरुध्द काँग्रेस अशी चढाओढ पहायला मिळू शकते. तसेही आजघडीला भारतीय राजकारणामध्ये भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस हे दोनच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय पक्ष आहेत. दोघांचे काही मित्रपक्ष असले, तरी दोघांचीही भूमिका समान आहे. भाजप आणि काँग्रेस या दोनही राजकीय पक्षांना आपापले राजकीय अवकाश व्यापायचे असेल, तर मित्रपक्षांचे राजकीय अवकाश काबीज करावे लागेल. या दोन्ही राजकीय पक्षांना आता परस्परांचे राजकीय अवकाश व्यापण्याची संधी फारच कमी आहे. अशा परिस्थितीत भाजपवर मित्रपक्षांच्या खच्चीकरणाची टीका होत असली, तरी या टीकेकडे दुर्लक्ष करत जागा वाढवण्यावर त्याचा भर असतो. आता काँग्रेसलाही तसेच करावे असे वाटायला लागले आहे. मित्रपक्षांना जास्त जागा सोडल्याने आपल्याला यश कमी मिळते; आणि मतांचा टक्का घसरतो, असे जाणवते. भाजप काँग्रेसमुक्त भारताची भाषा करत असला, तरी त्यालाही काही ठिकाणी प्रादेशिक पक्षांच्या खच्चीकरणासाठी काँग्रेसची आवश्यकता लागते. दिल्लीचे उदाहरण त्यासाठी बोलके आहे. प्रादेशिक पक्षाची ताकद संपली, की देश खऱ्या अर्थाने द्विपक्षीय व्यवस्थेकडे वाटचाल करू शकेल. हे लगेच होईल, असे नाही; परंतु दिल्ली, हरियाणाच्या निवडणुकीच्या निकालाकडे त्या दृष्टीने पाहता येईल.

✦✦✦

# साखरेच्या अर्थकारणाला गरज नव्या दिशेची

**केंद्र सरकारने दहा लाख टन साखरेच्या निर्यातीसाठी अलीकडेच हिरवा कंदील दाखवल्यामुळे देशातील साखरेच्या दरात वाढ होणे, जागतिक बाजारातील चढ्या दरांचा फायदा मिळणे आणि शेतकऱ्यांची ऊस देयके देण्यासाठी पैसै उपलब्ध होणे असे लाभ साखर उद्योगाला होणार आहेत. मात्र शेतकऱ्यांचे खरे हित साधायचे, तर उसाचा रस, साखर किंवा साखरेच्या पाकापासून निर्माण केल्या जाणाऱ्या इथेनॉलचा खरेदीदर वाढवला पाहिजे.**

केंद्र सरकारने देशातील दहा लाख टन साखर निर्यात करण्यासाठी अलीकडेच हिरवा कंदील दाखवला. या निर्णयामुळे देशातील साखरसाठा कमी होणे, पर्यायाने साखरेच्या दरात वाढ होणे, जागतिक बाजारातील चढ्या दरांचा फायदा मिळणे आणि शेतकऱ्यांची ऊस देयके देण्यासाठी पैसै उपलब्ध होणे असे लाभ साखर उद्योगाला होणार आहेत. भारतात साखर उद्योगावर लाखो लोकांचे आयुष्य अवलंबून आहे. देशातील ऊसगाळप हंगाम मध्यावर आला असताना, गेल्या वर्षीच्या तुलनेत देशांतर्गत साखर उत्पादनात तब्बल २० लाख टनांची घट झाली



आहे. हंगामाअखेरीस ही घट ४० लाख टन होईल, असा ताजा अंदाज आहे. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या आकडेवारीनुसार, मकरसंक्रांतीपर्यंत देशातील साखर उत्पादन १३० लाख टनांवर आले आहे. गेल्या वर्षी ते १५१ लाख टन होते. त्यामुळे कारखान्यांच्या तोट्यात वाढ होणार आहे. मागील वर्षी ५२४ कारखान्यांनी ऊस गाळप केले होते. यंदा ही संख्या ५०७ पर्यंत घसरली आहे. साखरेचा सरासरी उतारा ९.३७ टक्क्यांवरून ८.८१ टक्क्यांपर्यंत उतरला आहे.

गेल्या वर्षी या कालावधीत १६१२ लाख टन ऊसगाळप झाले. या वर्षी ते १४८२ लाख टन इतकेच झाले आहे. महाराष्ट्रात शंभर लाख टन गाळप कमी झाले आहे. आता केंद्र सरकारने सी हेवी मोलॅसिस किंवा मळीपासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा दर प्रति लिटर ५६.५८ रुपयावरून ५७.९७ रुपये केला आहे. उसाचा रस आणि बी हेवी मोलॅसिसपासून उत्पादित होणाऱ्या इथेनॉलचे दर मात्र पूर्वीइतकेच ठेवले आहेत. साखर उत्पादनात घट झाल्यामुळे नफा कमी होणार आहे. त्यामुळे या उद्योगाला आर्थिक आधार देणे, हा केंद्राचा हेतू आहे. परंतु मुळात सी हेवी मोलॅसिसपासून फारसे इथेनॉल तयारच होत नाही. शिवाय फक्त १.३९ रुपये इतकी अल्पस्वल्प वाढ झाल्याकारणाने शेतकरी आणि साखर कारखाने यांचा कितीसा फायदा होणार आहे? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहारविषयक केंद्रीय मंत्रिमंडळ समितीने इथेनॉलमिश्रित पेट्रोल कार्यक्रमांतर्गत १ नोव्हेंबर २०२४ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या इथेनॉल पुरवठावर्षासाठी दरवाढीचा निर्णय घेतला आहे. तो सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांना लागू आहे. म्हणजे या कंपन्या अधिक दराने इथेनॉल खरेदी करणार आहेत. केंद्राने २०२५-२६ या पुरवठावर्षात पेट्रोलमधील इथेनॉल मिश्रणपातळी २० टक्क्यांवर नेण्याची घोषणा केली आहे. सध्या १८ टक्क्यांपर्यंत मिश्रण केले जाते. देशातील साखर कारखान्यांमधून चालू वर्षात ६५० कोटी लिटर इथेनॉल उत्पादन होण्याची शक्यता आहे. यात उसाचा रस आणि बी हेवी मोलॅसिसपासून उत्पादित इथेनॉलचा वाटा ९० टक्क्यांपर्यंत आहे.

शेतकऱ्यांचे खरे हित साधायचे असेल, तर उसाचा रस, साखर किंवा साखरेच्या पाकापासून निर्माण केल्या जाणाऱ्या इथेनॉलचा खरेदीदर हा ६८.१३ रुपयांवरुन ७३.१४ रुपये करायला हवा. बी हेवी मोलॅसिसपासून उत्पादित इथेनॉलचा ६०.७३ रुपये हा दर ६७.७० रुपये करावा आणि सी हेवी मोलॅसिसपासून उत्पादित इथेनॉलला ५६.२८ रुपयांऐवजी ६१.२० इतका दर द्यावा, अशी साखर उद्योगाची मागणी होती. परंतु सरकारने फक्त सी हेवी मोलॅसिसचा दर, तोही फार कमी प्रमाणात वाढवला आहे. खरे तर, इथेनॉलचा दर आणि साखरेच्या किमान विक्री मूल्याचीही उसाच्या फेअर अँड रेम्युनरेटिव्ह प्राइस, म्हणजेच एफआरपीशी सांगड घालायला हवी. एफआरपी वाढवताना इथेनॉल आणि साखरेचे दरही वाढवावेत, अशी राज्य सहकारी साखर महासंघाची मागणी होती. पण दुर्दैवाने ती पूर्ण झालेली नाही. देशातील अतिरिक्त साखर उत्पादनामुळे गेल्या काही वर्षांमध्ये साखर उद्योग अडचणीत आला. यावर मार्ग म्हणून केंद्र सरकारने उसापासून इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहन दिले. त्यासाठी कारखान्यांना अल्प व्याजदराने अर्थसाह्य केले. खेरीज इथेनॉल पुरवठा केल्यानंतर, त्याची देयके २१ दिवसांमध्ये मिळू लागल्याने कारखान्यांवरील आर्थिक बोजा काही अंशी हलका झाला. पण इंधनाची मागणी वाढण्यासाठी त्याचे इंधनात २० टक्के मिश्रण करण्याचे धोरण अद्याप शंभर टक्के राबवले जात नव्हते. ते राबवले जावे, अशी मागणी साखर उद्योगाकडून होत होती.





हेमंत देसाई
ज्येष्ठ पत्रकार

आता इंधनात २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट भारत येत्या तीन महिन्यांमध्ये साध्य करेल, अशी घोषणा केंद्रीय रस्ते व वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी नुकतीच केली. या घोषणेचे साखर उद्योगाने जोरदार स्वागत केले होते. मात्र त्याच वेळी इथेनॉल खरेदीदर समाधानकारक असणे आवश्यक आहे, याचे भान केंद्राने ठेवले पाहिजे. मुळात पर्यावरणपूरक इंधन असलेल्या इथेनॉलच्या उत्पादनामुळे कच्च्या तेलाच्या आयातीमध्ये घट झाली आहे. दोन वर्षांपूर्वी देशात ५०२ कोटी लिटर इथेनॉलची निर्मिती होऊन २४ हजार कोटी रुपयांच्या परदेशी चलनाची बचत झाली होती. दहा वर्षांपूर्वी असलेले इथेनॉल मिश्रणाचे दीड टक्के प्रमाण २०२४ पर्यंत १५ टक्क्यांवर गेले. २०२५ मध्ये भारतात १७०० कोटी लिटर इथेनॉल बनणार आहे. यापूर्वी इथेनॉलच्या विक्रीतून कारखान्यांचा नफा वाढला. त्यातून कारखान्यांना उसाची थकबाकी भागवता आली होती. गेल्या दहा वर्षांमध्ये इथेनॉल विक्रीतून कारखान्यांनी ९४ हजार कोटी रुपयांहून अधिक महसूल मिळवला आहे. मात्र गेल्या वर्षी हंगाम सुरू झाल्यावर इथेनॉल निर्मितीवर निर्बंध लादण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर साखर निर्यातीचा महाराष्ट्राला सर्वाधिक, म्हणजे पावणेचार लाख टन कोटा मिळाला असून त्यामुळे राज्यातील साखर उद्योगात गोडवा निर्माण होणार आहे.

केंद्र सरकारने गेल्या वीस वर्षांमध्ये टप्प्याटप्याने इंधनात इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण वाढवत नेले, तरी प्रत्यक्षात अपेक्षित उद्दिष्ट गाठता आले नाही. उत्पादन करूनही इथेनॉल उचलले जात नव्हते. त्यामुळे काही वर्षांपूर्वी कारखान्यांनी उत्पादन थांबवले होते. आता इथेनॉलचे उत्पादन कंपन्या उचलतात आणि त्याचे पैसेही वेळेवर देतात, हे चांगले आहे. ब्राझीलमध्ये शंभर टक्के इथेनॉलवर चालणारी वाहने आहेत. ब्राझीलने तसा निर्णय वीस वर्षांपूर्वीच घेतला. भारतात मात्र अजूनही इथेनॉलमिश्रित इंधनावरच भागवले जाते. इथेनॉलचे इंधनातील प्रमाण वाढवण्याला वाहन उद्योगातील काहींचा मोठा विरोध असतो. वास्तविक, आपल्याकडेही शंभर टक्के इथेनॉलवर वाहने चालवण्याचा प्रयोग यशस्वी झाला आहे; परंतु त्या दृष्टीने वाहन उद्योग आणि सरकारही पुढे जायला तयार नाहीत. एकीकडे इंधन आयातीवर लाखो कोटी रुपये खर्च करायचे, डॉलरची गंगाजळी वापरायची आणि दुसरीकडे इथेनॉल निर्मितीबाबत धरसोड निर्णय घ्यायचा, हे कुठे तरी थांबले पाहिजे.

गेल्या वर्षी साखर उत्पादन कमी होण्याचा अंदाज असल्यामुळे इथेनॉल निर्मितीला परवानगी नाकारली गेली. प्रत्यक्षात साखर उत्पादनाचा अंदाज चुकला आणि या वर्षी जादा साखर उत्पादन होईल, म्हणून उसाच्या रसापासून इथेनॉल निर्मितीला परवानगी दिली, तर साखर उत्पादन अपेक्षेपेक्षा फारच कमी होणार आहे. सरकारच्या हाती एवढ्या यंत्रणा, उपग्रह असूनही ऊस आणि साखर उत्पादनाचा अंदाज चुकतो आणि सरकार धरसोडपणाचे निर्णय घेते. फार अगोदर जागतिक बाजाराचा अभ्यास करून पुढच्या सहा महिन्यांमध्ये जागतिक परिस्थिती काय असेल, देशातील उत्पादन किती असेल, याचा अंदाज घेऊन साखर उत्पादन किती करायचे आणि इथेनॉल निर्मितीला उसाचा किती रस जाऊ द्यायचा, हे ठरवता आले पाहिजे. त्याचबरोबर साखरनिर्यातीच्या निर्णयातही धरसोडपणा करून चालणार नाही. एक तर भारतीय साखरेला जागतिक बाजारात अतिशय कमी मागणी असते. त्यात ठरवूनही आपण निर्यात करू न शकल्यास भारतीय साखर उद्योगावर कुणीही विश्वास ठेवणार नाही. इथेनॉल निर्मितीसाठी उसाशिवाय अन्य पर्यायाचाही विचार करायला हवा. मका, स्वीट सोरगमसह अन्य वस्तूंचा वापर करून इथेनॉल निर्मिती वाढवायला हवी. तसे केल्यास एखाद्या वर्षी साखर उत्पादन कमी झाले म्हणून इथेनॉल उत्पादन कमी करायचे, ही वेळ येणार नाही.

✦✦✦

---

**गेल्या दोन वर्षांपासून मणिपूर दंगलीच्या होरपळीत गुदमरले असताना पंतप्रधानांसह भाजपच्या अन्य नेत्यांना मणिपूरचा प्रश्न सोडवण्यासाठी गांभीर्याने प्रयत्न करावेत असे वाटले नाही. अन्य राज्यांमध्ये असे काही न घडताही भाजपने नेतृत्व बदलले; परंतु मित्रपक्षांतील वारंवार इशारे देऊनही दखल घेतली नाही. आता मित्रपक्षांनी पाठिंबा काढला तसेच स्वकीयांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर भाजपने मुख्यमंत्री बदलाचा निर्णय घेतला.**

# उशिरा सुचलेले शहाणपण

आपल्याविरोधातील अविश्वास प्रस्तावातील पराभव जवळपास निश्चित झालेला पाहून बीरेन सिंह यांनी मणिपूरच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. झपाट्याने बदललेल्या नाट्यमय घडामोडींनंतर आता मुख्यमंत्रिपद कुणाला दिले जाणार तसेच गेल्या २१ महिन्यांपासून सुरू असलेल्या हिंसाचाराला आळा घालण्यात यश येईल का, असे सवाल उपस्थित केली जात आहे; मात्र या प्रश्नांची उत्तरे सध्या तरी कोणाकडे नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावरून परतल्यानंतर तिथे मुख्यमंत्री कुणाला करायचे, याबाबत निर्णय अपेक्षित आहे. दिल्ली आणि मणिपूर या दोन राज्यांच्या मुख्यमंत्रिपदी कुणाची वर्णी लावायची, याचा निर्णय मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे घेतील. तोपर्यंत दोन्ही ठिकाणी काळजीवाहूंच्या हाती कारभार राहील. मणिपूरमधील बहुसंख्य मैतेई समुदायाला अनुसूचित जमातीचा दर्जा देण्याच्या उच्च न्यायालयाच्या शिफारशीनंतर ३ मे २०२३ रोजी राज्यात मोठ्या प्रमाणावर हिंसाचार उसळला. सरकारी आकडेवारीनुसार, त्या हिंसाचारात आतापर्यंत २५० हून अधिक लोक मरण पावले आहेत, तर शेकडो कोटींची मालमत्ता जळून खाक झाली आहे आणि पाच हजारांहून अधिक लोकांचे बळी गेले आहेत. मणिपूर, मिझोराम आणि नागालँडमधील मदत छावण्यांमध्ये विस्थापित राहतात. हिंसाचार सुरू झाल्यापासून, बीरेन सिंह हे सरकारवर मैतेई संघटनांना मदत करत असल्याचा आरोप करत आहेत. अलीकडेच व्हायरल झालेल्या एका ऑडिओ क्लिपमध्ये बीरेन सिंह यांनी सरकारी शस्त्रे लुटण्यात कथितपणे मदत केल्याचा दावा केला गेला.

मणिपूर राज्य डोंगराळ भाग आणि खोऱ्यात विभागले गेले आहे. मैतेईंचे वर्चस्व असलेल्या घाटी भागात २० विधानसभा जागा आहेत. हिंसाचाराच्या सुरुवातीपासूनच डोंगरी भागातील दोन आमदारांसह बीरेन सिंह यांना घेराव घालण्यात आला. राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे की, मे २०२३ मध्ये कुकी आणि मैतेई समुदायांमध्ये जातीय हिंसाचार सुरू झाल्यानंतरही बीरेन सिंह यांच्यावर मैतेई संघटनांना शस्त्रे पुरवल्याचा आरोप आहे. भाजपने त्यांना खुर्चीवरून हटवण्याचा धोका पत्करला नाही. मैतेई आणि कुकी समाजात प्रचंड कटुता निर्माण झाली आहे. भाजपच्या आमदारांनी पूर्वी दिल्लीत शहा यांची भेट घेऊन नेतृत्वबदलाची मागणी केली होती. तरीही भाजपच्या प्रदेशाध्यक्ष ए. शारदा देवी मात्र आमदारांमध्ये कोणतेही मतभेद नसल्याचे सांगतात. बीरेन सिंह यांनी राज्याचे हित लक्षात घेऊन पदाचा राजीनामा दिला आहे, असे सांगितले जात असले, तरी त्यासाठी दंगलीच्या वणव्यात मणिपूरला दोन वर्षे का होरपळू दिले, असा प्रश्न उरतो. इतके दिवस राज्याचे हित त्यांच्या लक्षात येत नव्हते का, मोदी-शहा यांची त्यांना दूर करण्यात कोणती अडचण होती, याचे उत्तर भाजप देत नाही. कुकी-जो कौन्सिलचे अध्यक्ष एच. थांगलिअट यांनी मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याने काहीही साध्य होणार नाही, असे स्पष्ट केले आहे. ते म्हणतात, दोन वर्षे मैतेई समाजाने आम्हाला वेगळे केले आहे. तेव्हापासून आमच्या समाजातील शेकडो लोकांना प्राण गमवावे लागले आहेत. आता बीरेन सिंह यांच्या राजीनाम्यानंतरही परिस्थिती पूर्वपदावर आणणे शक्य नाही. आम्हाला कोणत्याही किंमतीवर स्वतंत्र प्रशासन हवे आहे.





बीरेन सिंह

वर्तमान
महेश जोशी

या विधानांवरून कुकी आणि मैतेई समाजातील दरी किती रुंदावली आहे, हे स्पष्ट होते. हे दोन समाज अजूनही एकत्र यायला तयार नाहीत. दोन समाज एकत्र आले, तर अघटित होण्याची भीती त्यांना वाटते. दोन समाजांना परस्परांसमोर बसवून विश्वास देण्यात सुरक्षा यंत्रणा आणि सरकारही कमी पडले आहे. बीरेन सिंह यांच्याऐवजी मणिपूर खोऱ्यातील मैतेई समाजाचा दुसरा नेता मुख्यमंत्री झाला, तर राज्याची समस्या 'जैसे थे'च राहणार आहे. दहा फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विरोधकांनी सरकारविरोधात अविश्वास प्रस्ताव मांडण्याची नोटीस दिली होती. अनेक महिन्यांपासून नेतृत्वबदलाची मागणी करणाऱ्या भाजपच्या किमान दीड डझन आमदारांनी या अविश्वास प्रस्तावाला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला होता. मैतेईंचे वर्चस्व असलेल्या इंफाळ खोऱ्यातील घटत्या लोकप्रियतेमुळे, त्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विरोधकांचा वाढता दबाव आणि पक्षातील वाढता असंतोष यामुळे बीरेन सिंह यांनी केंद्रीय नेत्यांच्या सल्ल्याने राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. अर्थसंकल्पीय अधिवेशनात विरोधकांनी मांडलेल्या अविश्वास प्रस्तावामुळे केंद्रीय नेतृत्वाला भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी पराभव टाळण्यासाठी बीरेन सिंह यांचा राजीनामा घेतला. सिंग यांच्या राजीनाम्यामुळे दीड वर्षांहून अधिक काळ हिंसाचारग्रस्त राज्यात कायमस्वरूपी शांततेसाठी चर्चेचा मार्ग मोकळा झाला आहे. कायम शांततेसाठी वाटाघाटी पुढे नेण्याच्या बीरेन सिंह यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर कुकी समाज ठाम होता.

कुकी आणि मैतेई समुदायांमध्ये विवादाचे २० मुद्दे आहेत. त्यापैकी दोन्ही समुदायांचे नेते परस्पर चर्चेद्वारे १४ समस्या सोडवण्यास तयार आहेत. उर्वरित सहा मुद्द्यांवर एकमत होण्यासाठी केंद्र सरकार मध्यस्थाची भूमिका बजावू शकते. दोन समुदायांमधील अविश्वासाचे संकट अधिक गडद झाले आहे. मणिपूर उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे सुरू झालेल्या हिंसाचारानंतर कुकी आणि मैतेई समुदायांमधील जुने वाद पुन्हा उफाळून आले. त्यातून कोणीही मागे हटण्यास तयार नव्हते. दोन समुदायांमधील अविश्वास इतका वाढला की ते समोरासमोर बोलण्यासही तयार नव्हते. केंद्र सरकारच्या प्रयत्नांमुळे हळूहळू हा प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न सुरू झाले आणि आता दोन्ही समाजाचे नेते परस्पर संवादातून बहुतांश प्रश्न सोडवण्यास तयार आहेत. बीरेन सिंह यांच्या राजीनाम्यानंतर दोन्ही समाजांच्या प्रतिनिधींमध्ये चर्चा सुरू होईल, असे मानले जात आहे. चर्चेला गती देण्यासाठी मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा आणि राज्यपाल अजय भल्ला यांच्याकडे धुरा सोपवण्याचा विचार केला जात आहे. पाच वर्षे गृहसचिव म्हणून काम केलेल्या भल्ला यांना मणिपूरमधील समस्यांची पूर्ण जाणीव आहे आणि त्यांनी मैतेई आणि कुकी नेत्यांना चर्चेसाठी पटवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

काही मुद्द्यांवर परस्परसंमती मिळत नाही. त्यात कुकी समाजाची त्यांच्या वर्चस्वाखालील भागांसाठी स्वतंत्र राज्याची मागणी आणि म्यानमारमधून होणारी घुसखोरी रोखण्यासाठी कठोर तरतुदी करण्याची मागणी मेतैई समाजाने केली आहे. मणिपूरच्या संपूर्ण क्षेत्रापैकी फक्त दहा टक्के इम्फाळ व्हॅली आहे. तिथे ६० टक्के लोक राहतात. त्यापैकी बहुतेक मैतेई आहेत. उर्वरित ९० टक्के भागात ४० टक्के आदिवासी लोकसंख्या आहे. त्यात कुकींचा समावेश आहे. मैतेई आणि कुकी तसेच विविध आदिवासी समुदायांमध्ये वेळोवेळी हिंसक चकमकी झाल्या आहेत. या चकमकी सतत वाढत राहिल्या आहेत. याआधी हिंसाचार थांबवण्यासाठी आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी तात्काळ पावले उचलण्यात आली होती; परंतु वादाच्या सर्व प्रश्नांवर कायमस्वरूपी तोडगा निघाला नाही. एक मे २०२३ रोजी हिंसाचार सुरू होण्यापूर्वी केंद्र सरकारच्या पुढाकाराने कुकी, मेतैई आणि इतर आदिवासी समुदायांमधील वाद सोडवण्याचे प्रयत्न अंतिम टप्प्यात पोहोचले होते. साहजिकच आता यावर नव्याने काम करावे लागणार आहे. बीरेन सिंह यांना हटवण्यात एका दृष्टीने भाजपचा फायदाच झाला. कारण सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनी दुसऱ्या पक्षाच्या आमदारांना भेटून नवे नेतृत्व तयार केले असते आणि तिसरी आघाडी स्थापन केली असती, तर भाजपच्या अडचणी वाढू शकल्या असत्या. राजिनाम्यामुळे आता तसे होणार नाही. त्यामुळे किमान पुढचा मुख्यमंत्री भाजपमधूनच होणार आहे. मात्र तो हा वाद शमविण्यात काही ठोस भूमिका बजावू शकेल का, हे आत्ताच सांगणे कठिण आहे.

✦✦✦

# जीवघेणी चेंगराचेंगरी कशी रोखणार ?



डॉ. भूषणकुमार उपाध्याय

पोलिस प्रशिक्षणामध्ये आपत्ती व्यवस्थापन हा स्वतंत्र विषय आहे. चेंगराचेंगरीच्या घटना टाळण्यासाठी या विषयाकडे अधिक गांभीर्याने पाहायला हवे. प्रशिक्षणार्थी पोलिस अधिकारी आणि अंमलदारांना मोठ्या गर्दीच्या ठिकाणी नेऊन या विषयाचे वास्तविक प्रशिक्षण दिले पाहिजे.

काही दिवसांपूर्वी प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यात चेंगराचेंगरी होऊन तीस जणांचा मृत्यू झाला. त्यापूर्वी तिरुपती येथील बालाजी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत सहा भाविक ठार झाले होते. गेल्या साधारण दोन दशकात चेंगराचेंगरीच्या अशा घटनांमध्ये शेकडो लोकांचा मृत्यू झाला आहे. प्रयागराजमधील अलीकडची दुर्घटना वगळता यातील बहुतांश घटनांची चौकशी पूर्ण झाली आहे. यापैकी काही प्रशासकीय, तर काही न्यायालयीन आहेत. या चौकशांच्या अहवालांमध्ये त्या त्या घटनेचे कारण देतानाच, संभाव्य उपाययोजनेबाबतही शिफारशी करण्यात आल्या आहेत. या घटनांच्या कारणांमध्ये; जास्त प्रमाणात झालेली गर्दी, गर्दीमध्ये निर्माण झालेली घबराट, तोकडी पोलिस व्यवस्था, अव्यवस्थित नियोजन, अफवा आदी महत्त्वाची कारणे दिली आहेत.

अशा अहवालांच्या आधारे, ज्या ठिकाणी जास्त प्रमाणात गर्दी होणार आहे, तेथे चेंगराचेंगरी टाळण्यासाठी काय उपाययोजना केली पाहिजे, याचे सखोल नियोजन करणे महत्त्वाचे असते. पूर्वी त्या ठिकाणी किती गर्दी झाली होती? अशा काही घटना घडल्या होत्या का? तसेच यंदा तिथे किती गर्दी होण्याची शक्यता आहे? आदी सर्व गोष्टींची माहिती प्रशासनाकडे असायला हवी. त्यानुसार गर्दीचा प्रवेश कुठून आणि कसा राहिल? गर्दीचा बाहेर पडण्याचा मार्ग कसा असेल? याचे नियोजन होणे महत्त्वाचे असते.

काही कारणाने आतील गर्दी पुढे सरकत नसेल, तर प्रवेशद्वारातून येणारी गर्दी थांबवली पाहिजे, तसेच ठरविक अंतरांवर होल्डिंग एरिया ठेवला पाहिजे, जेणेकरुन गर्दी अनियंत्रित होणार नाही. रात्रीच्या वेळी प्रकाश व्यवस्था चांगली असावी. गर्दीच्या नियंत्रणात कम्युनिकेशन अर्थात संप्रेषण प्रणाली फार महत्त्वाची ठरते. बंदोबस्त ठेवणाऱ्या पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये व्यवस्थित संभाषण असले पाहिजे. त्यासाठी वॉकीटॉकीचा योग्य वापर आवश्यक आहे.

अनेकदा अफवा पसरल्यानेही दुर्घटना घडतात. काही दिवसांपूर्वी जळगावजवळ ट्रेनमध्ये आग लागल्याच्या अफवेमुळे प्रवाशांनी धावत्या गाडीतून उड्या मारल्या आणि दुसऱ्या दिशेने येणाऱ्या ट्रेनखाली १२ जण चिरडले गेले, तितकेच जखमी झाले. रांगेतील गर्दीतही अफवेमुळे चेंगराचेंगरीच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे अफवा पसरु नयेत तसेच लोकांना अचूक आणि परिपूर्ण माहिती देणारी (पब्लिक अॅड्रेसिंग) सक्षम यंत्रणा असणे आवश्यक आहे. ही यंत्रणा प्रभावीपणे वापरण्यासाठी स्थानिक पोलिस, प्रशासन आणि देवस्थान समिती यांच्यात सुयोग्य समन्वय असला पाहिजे. जिथे जागा उपलब्ध आहे, तिथे बाहेर जाण्याचे स्वतंत्र मार्ग आधीच निश्चित करावेत.

या यंत्रणांना गर्दीच्या मानसिकतेचाही (मॉब सायकॉलॉजी) अभ्यास असायला हवा. त्याप्रमाणे जाण्या-येण्याचे मार्ग, प्रसाद वाटपाची वा थांबण्याची ठिकाणे निश्चित करुन त्यानुसार बंदोबस्त लावावा. पोलिसांचे ड्रिल आणि बंदोबस्ताचा सराव प्रत्यक्षातील परिस्थिती हाताळताना उपयुक्त ठरतो. अशा धार्मिक यात्रा, सोहळ्यांच्या ठिकाणी प्रथमोपचारासोबतच गंभीर प्रसंगी लागणाऱ्या वैद्यकीय उपचार सुविधांची उपलब्धता असणे अत्यावश्यक आहे.

त्याशिवाय, सुस्थितीतील अग्निशमन वाहने योग्य ठिकाणी उभी असावीत. योग्य ठिकाणी मजबूत बॅरिकेडिंग असावे. गदीर्चे रिअल टाइम अवलोकन करुन आवश्यकतेनुसार तत्काळ उपाययोजना करण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा प्रभावीपणे वापरली पाहिजे. गर्दी कुठे जास्त आणि कुठे कमी आहे, यावर सतत लक्ष ठेवणे आवश्यक असते. त्यासाठी नियंत्रण कक्षात कार्यक्षम अधिकारी नियुक्ती करावेत. गर्दीमुळे होऊ शकणाऱ्या दुर्घटनेसंदर्भात जनतेतही जागरुकता निर्माण केली पाहिजे. त्यासाठी देवस्थान समितीच्या सहाय्याने स्वयंसेवकांना प्रशिक्षण देऊन त्यांना पोलिसांसोबत नियुक्त केले जावे. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने (एनडीएमए) गर्दीवर नियंत्रण ठेवण्याबाबत आणि चेंगराचेंगरी होऊ नये, यासाठी अनेक उपाययोजना सुचवल्या आहेत.

मोठी गर्दी अपेक्षित असलेल्या ठिकाणी पायाभूत सुविधा उपलब्ध करणे, परिणामकारक पॅनिक मॅनेजमेंट, गदीर्चे लाइव्ह ट्रॅकिंग तसेच थर्मल आणि लेझर सेन्सरचा वापर, कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग अशा महत्त्वाच्या उपायांचा त्यामध्ये समावेश आहे.

पोलिस प्रशिक्षणामध्ये आपत्ती व्यवस्थापन हा स्वतंत्र विषय आहे. या विषयाकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. प्रशिक्षणार्थी पोलिस अधिकारी आणि अंमलदारांना मोठ्या गर्दीच्या ठिकाणी नेऊन या विषयाचे वास्तविक प्रशिक्षण द्यायला हवे. ■

# आणखी कशाकशावर वक्फचा हक्क?



संसदेत सादर केलेल्या संयुक्त संसदीय समितीच्या (जेपीसी) अहवालात असे दिसून आले आहे की देशातील राष्ट्रीय महत्त्वाची सुमारे 280 स्मारके वक्फ बोडार्ची मालमत्ता म्हणून घोषित करण्यात आली आहेत. यातील बहुतेक स्मारके राजधानी दिल्लीत आहेत.

कुतुबमिनार, फिरोजशाह कोटला, पुराण किल्ला, हुमायूनचा मकबरा, जहांआरा बेगमचा मकबरा, कुतुबमिनार परिसरातील लोखंडी स्तंभ आणि इल्तुतमिशचा मकबरा यासारख्या स्मारकांवरही वक्फचा दावा आहे.

समितीच्या सुनावणीदरम्यान, भारतीय पुरातत्व सर्वेक्षणने या स्मारकांची यादी सादर केली होती. याशिवाय, नगरविकास मंत्रालयाने समितीला सांगितले की, भू-विकास विभागाच्या 108 मालमत्ता आणि डीडीएच्या 130 मालमत्ता वक्फच्या ताब्यात देण्यात आल्या आहेत. वक्फने नंतर या स्मारकांवर आपला दावा सांगितला. एकेकाळी वक्फ बोर्डाकडे देशात 52 हजार नोंदणीकृत मालमत्ता होत्या. आज 9.4 लाख एकर जमिनीवर ८.७२ लाख स्थावर मालमत्ता आहेत.

वक्फ मालमत्ता म्हणजे मुस्लिमांनी धार्मिक किंवा धर्मादाय कारणांसाठी दान केलेली मालमत्ता. या कायद्यानुसार, नोंदणीकृत मालमत्ता विकता येत नाही किंवा तिची मालकी बदलता येत नाही, परंतु नवीन कायद्यामुळे अनेक गोष्टी बदलतील, जसे की...

पूर्वी वक्फ कायदा, १९९५ असे म्हटले जात असे. पुढे त्याला एकीकृत वक्फ व्यवस्थापन, सक्षमीकरण, कार्यक्षमता आणि विकास कायदा असे म्हटले जाईल.

पूर्वी, वक्फ जमिनीवर दावा करणारी व्यक्ती वक्फ ट्रिब्युनलमध्ये अपील करू शकत होती, परंतु आता तो न्यायालयातही अपील करू शकतो.

पूर्वी, न्यायाधिकरणाच्या निर्णयाला आव्हान देता येत नव्हते, परंतु आता उच्च न्यायालयात आव्हान देता येते.

पूर्वी, मशीद बांधण्यासाठी किंवा इस्लामिक उद्देशांसाठी वापरलेली जमीन वक्फची होती. आता फक्त दान केलेली जमीन वक्फ असेल, जरी त्यावर मशीद असली तरीही. यापूर्वी महिला आणि इतर धर्माचे लोक वक्फ बोर्डाचे सदस्य असू शकत नव्हते. आता दोन महिला आणि दोन बिगर मुस्लिम सदस्य असणे आवश्यक आहे. वक्फ कायद्यांतर्गत आधीच नोंदणीकृत असलेल्या मालमत्तांवर परिणाम होणार नाही. ज्यांची नोंदणी झालेली नाही ते नवीन मानकांचे पालन करतील. ज्यांना बोडार्ला जमीन दान करायची आहे त्यांना ते गेल्या ५ वर्षांपासून इस्लाम धर्माच पालन करत असल्याचे जाहीर करावे लागेल.

'वक्फ' हा शब्द अरबी शब्द 'वकुफा' पासून आला आहे ज्याचा अर्थ थांबणे असा होतो. इस्लाममध्ये, वक्फ हा धमार्दाय दानाचा एक प्रकार आहे, जो समाजाला समर्पित केलेला आहे.

जो व्यक्ती आपली मालमत्ता वक्फला देतो त्याला वकिफा म्हणतात. देणगी देताना, वकिफा अशी अट घालू शकतो की त्याच्या मालमत्तेतून मिळणारे उत्पन्न फक्त शिक्षण किंवा रुग्णालयांवर खर्च केले पाहिजे. वक्फ बोर्डावरून सद्धया देशभरात कल्लोळ माजला आहे. केंद्र सरकारने याविषयीचे बील संसदेत मांडले असून, विरोधकांचा नेहमीप्रमाणे विरोध सुरूच आहे. वक्फ बोर्डाने आता कुतूबमिनारवर हक्क सांगितला. उद्या आणखी काय काय त्यांचे? हा प्रश्न येईलच. ■

# ग्रामीण सरकार चालवण्यात कर्नाटक अग्रेसर



पंचायत राजच्या बाबतीत कर्नाटक हे देशातील सर्वोत्तम राज्य आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन (दिल्ली) ने तयार केलेल्या पंचायत विकेंद्रीकरण निर्देशांक-२०२४ मध्ये कर्नाटकच्या ग्रामपंचायती पहिल्या क्रमांकावर आहेत. केरळ दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि तामिळनाडू तिसऱ्या क्रमांकावर आहे. म्हणजेच पहिल्या तीन स्थानांवर दक्षिण भारतातील राज्ये आहेत. २०२४ च्या निदेर्शांकात महाराष्ट्र चौथ्या स्थानावर पोहोचला आहे, जो २०१६ मध्ये दुसऱ्या स्थानावर होता. दरम्यान, मध्य प्रदेश यावेळी १२ व्या स्थानावर घसरला, जो २०१६ च्या निदेर्शांकात ९ व्या स्थानावर होता. आंध्र ११ व्या स्थानावर आहे. ग्रामपंचायतींची चौकट, कामकाज, वित्त, अधिकारी, क्षमता बांधणी आणि जबाबदारी यासारख्या निकषांवर राज्यांची क्रमवारी लावण्यात आली. १३ राज्यांना ५० पेक्षा जास्त गुण मिळाले तर राष्ट्रीय सरासरी ४३.९ गुण होती, जी मागील निदेर्शांकापेक्षा १० गुणांनी जास्त आहे. १४ राज्ये राष्ट्रीय सरासरीपेक्षा चांगली कामगिरी करत आहेत. राज्य सरकारे ग्रामपंचायतींना किती अधिकार आणि संसाधने देत आहेत हे शोधण्यासाठी हा निदेर्शांक तयार करण्यात आला आहे. निर्देशांकातील पहिल्या तीन स्थानांवर दक्षिण भारतीय राज्ये आहेत. महाराष्ट्रात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस मिळून महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले. कोरोना काळामुळे सरकारला फारसे काही करता आले नाही आणि अडीच वर्षानंतर सरकार गडगडले. नंतरच्या काळात आलेले शिंदे सरकार सातत्याने महाराष्ट्र सर्वच बाबतीत अग्रेसर असल्याचे सांगत राहिले. आता आता स्थापन झालेले फडणवीस सरकारही तोंडाच्या वाफा सोडत आहे. पण, अनेक बाबतीत महाराष्ट्र माघारल्याचे दिसून येते. पंचायत राज व्यवस्थेतील क्रमांक तरी हेच सांगतो. पाडापाडी, पक्षांतर, भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी यात मात्र महाराष्ट्र कायम अव्वल आहे. ■ ■

# मुंबईत सुरू होणार बिबट्या सफारी

मुंबई येथील बोरिवलीच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात बिबट्याची सफारी सुरू होणार आहे. राज्याचे माहिती तंत्रज्ञान तथा सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी यासंदर्भात घोषणा केली आहे. बिबट्याची सफारी सुरू करण्यासंदर्भात त्यांनी वन विभागाला सूचना केल्या असून प्रस्ताव सादर करण्याचेही निर्देश दिले आहेत. तसेच या उद्यानात दोन सिंह वर्षभरासाठी दत्तक घेण्यात आले आहेत.



आशिष शेलार यांनी बोरिवली येथील संजय गांधी नॅशनल पार्कचा पाहणी दौरा केला. यावेळी त्यांच्यासोबत उपनगराचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, मुख्य वनरक्षक श्रीजी मल्लिकार्जुन, उपसंचालक रेवती कुलकर्णी, सहाय्यक वनरक्षक सुधीर सोनवणे, मुख्य सुरक्षा अधिकारी योगेश महाजन आणि संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये जिथे बिबट्याचे बछडे आढळून येतात त्यांना याच उद्यानात संरक्षित ठेवण्यात आले आहे. मात्र, पर्यटकांना पाहण्यासाठी त्यांची सफारी उपलब्ध नाही.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुमारे 30 हेक्टर जागा लागणार असून ही जागा या क्षेत्रात उपलब्ध आहे. तसेच प्रकल्प उभारणीसाठी जवळपास 5 कोटींचा खर्च अपेक्षित आहे. मुख्य वनरक्षक श्रीजी मल्लिकार्जुन यांनी सादर केलेल्या रिपोर्टनुसार, या राष्ट्रीय उद्यानाला वर्षभरात 20 लाख पर्यटक भेट देतात. जर बिबट्याची सफारी उपलब्ध झाली तर पर्यटकांची संख्या वाढेल व त्यातून वनक्षेत्रात उत्पन्न वाढेल, अशी माहिती देत मंत्री आशिष शेलार यांच्यासमोर सादरीकरण केले.

या उद्यानात भारत आणि भारती असे दोन 3 वर्षांचे सिंह 26 जानेवारी रोजी गुजरातमधून आणण्यात आले आहेत. त्यांना वर्षभरासाठी आशिष शेलार यांनी दत्तक घेतले आहे. त्यांचा पालनपोषणासाठी होणारा खर्च शेलार वैयक्तिकरित्या करणार आहेत. ■ ■ ■

# दंगल आणि दबदबा?

दत्तात्रय जाधव

महाराष्ट्र केसरीची गदा उंचावणे हा प्रत्येक पैलवानासाठी गौरवाचा क्षण असतो आणि त्यासाठी त्यांचा प्रवास निर्विवाद, पारदर्शक आणि न्याय्य असला पाहिजे. प्रशासनाने, संघटनांनी आणि राजकीय नेत्यांनी यामध्ये अनावश्यक हस्तक्षेप न करता फक्त खेळाडूंच्या उज्ज्वल भविष्यासाठी कार्य केले पाहिजे. तसे झाले तरच कुस्तीमध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राचा दबदबा निर्माण होईल. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा वादामुळे पुन्हा चर्चेत आली आहे.

१९६१ मध्ये सुरूवात झालेल्या या स्पर्धेला महाराष्ट्रातील सर्वांत प्रतिष्ठेचे कुस्तीचे मैदान मानले जाते. या स्पर्धेत यशस्वी झालेल्या पैलवानांचे राष्ट्रीय स्तरावरील स्थान अधिक भक्कम होते. आजवर यातून अनेक कुस्तीपटूंनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी झेपही घेतली आहे. त्यामुळे हिंदकेसरीपासून ते जागतिक स्पर्धांतील सहभागासाठी महाराष्ट्र केसरी हा महत्त्वाचा किताब मानला जातो. या स्पधेर्ने आजवर असे अनेक दिग्गज पैलवान घडवले आहेत, ज्यांनी पुढे राज्यासाठी, देशासाठी पदके मिळवली.

अहिल्यानगरमध्ये नुकत्याच झालेल्या यंदाच्या स्पर्धेत पराकोटीचा वाद झाला. दोन संघटनांतील चढाओढीमुळे या स्पधेर्ला, त्यातून उद्भवलेल्या वादाला वेगळे वळण देण्याचाही प्रयत्न होत आहे. त्यातच दुर्दैवाने काही राजकीय नेतेमंडळीही आपली पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. खरे तर खाशबा जाधव यांच्या रुपाने देशाला पहिले ऑलिम्पिक पदक मिळवून देणाऱ्या महाराष्ट्राच्या कुस्ती क्षेत्राची परंपरा आणि लौकिक वेगळा आहे. त्याला असे प्रकार कदापि शोभणारे नाहीत. या खेळाच्या व्यापक हितासाठी ते तत्काळ थांबले पाहिजेत.

नुकत्याच झालेल्या स्पर्धेतील उपांत्य आणि अंतिम सामन्यांमध्ये रेफ्रीची चूक झाली असेल, तर त्याबाबत एक समिती नेमून चौकशी व्हायला हवी. खेळाडूंना निर्णय वा निकाल चुकल्याचे वाटत असेल, तर त्यांनी कुस्तीगीर संघाकडे अर्ज देऊन संबंधित रेफ्रीवर बंदीची मागणी केली पाहिजे. मात्र, त्यासाठी हीन भाषेचा वापर वा लाथा मारण्यासारखे प्रकार होणे पूर्णतः चुकीचे आहे. अशा गोष्टींमुळे कुस्ती आणि कुस्तीगीर या दोहोंची प्रतिष्ठा खालावते. म्हणून घडल्या प्रकाराचे समर्थन होऊच शकत नाही. तथापि, त्यानंतर संबंधित पैलवानांवर तब्बल तीन वर्षे बंदी घालण्याचा निर्णयही तितकाच अवास्तव आणि अनाठायी आहे, हे लक्षात घ्यावे लागेल.

या स्पर्धेपर्यंत येण्यासाठी पैलवानांना अनेक वर्षे कसून मेहनत करावी लागते. त्यामुळे एकदम एवढी मोठी शिक्षा देणे त्यांच्या आणि एकूणच राज्याच्या कुस्ती क्षेत्राच्या भवितव्यासाठी हानिकारक ठरू शकते. बंदी घातलेल्या शिवराज राक्षे आणि महेंद्र गायकवाड यांच्याकडून महाराष्ट्राला देश पातळीवर खूप मोठ्या अपेक्षा आहेत, याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. खेळाडूंनीही कुस्तीगीर संघाच्या पदाधिकाऱ्यांना भेटून आपल्यावरील बंदी उठवण्यासाठी दाद मागायला हवी. आणि संघानेही कुस्ती क्षेत्राच्या तसेच खेळाडूंच्या हिताचा विचार करुन बंदी उठवण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

या वादाच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या कुस्ती क्षेत्राची संघटनात्मक स्थितीही समजून घेतली पाहिजे. राज्याच्या कुस्ती क्षेत्रात महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ हे दोन प्रमुख गट आहेत. भारतीय कुस्ती महासंघाने दोन वर्षांपूर्वी राज्य कुस्तीगीर परिषदेची मान्यता रद्द केली. त्यामुळे मान्यता असलेल्या राज्य कुस्तीगीर संघाच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी खेळाडू पाठवले जातात.

कुस्तीपटूंना अधिकृत स्पर्धांमध्ये सहभागी व्हायचे असेल, तर त्यांना या संघाच्या माध्यमातून पुढे जावे लागते. उत्तराखंडमध्ये होत असलेल्या राष्ट्रीय स्पधेर्साठीही महाराष्ट्राचा संघ या संघटनेने पाठवला आहे. अर्थात, या दोन्ही संघटनांतील पदाधिकाऱ्यांनी मान्यता किंवा श्रेष्ठत्वापेक्षाही या क्षेत्रातील आपल्या ज्ञान आणि अनुभवाचा कुस्तीगीरांना कसा लाभ होईल, याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

या वर्षीच्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेमध्ये शिवराज राक्षे, महेंद्र गायकवाड आणि पृथ्वीराज मोहोळ यांच्याकडून मोठ्या अपेक्षा होत्याच. मात्र, या स्पर्धेतील निकालापेक्षा ज्यांना कुस्तीतले काही कळत नाही अशांनीही या वादातून आपली प्रसिद्धी करून घेतली. राजकीय पक्षांनीही या वादावर आपले भांडवल केले. त्यामुळे खरी कुस्ती आणि पैलवानांच्या मेहनतीकडे दुर्लक्ष झाले. शिवाय, या सगळ्या वादामुळे राज्यातील कुस्तीपटूंना मोठा फटका बसला आहे. त्यामुळे खेळाडूंनी कोणत्याही संघटनांच्या संघर्षात न अडकता स्पर्धेवर लक्ष केंद्रित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

त्यांच्यासाठी महाराष्ट्र केसरी स्पर्धा ही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर जाण्याची पायरी असते. त्यामुळे राजकारण आणि माध्यमांतील चर्चा, आरोप-प्रत्यारोपांच्या गदारोळात खेळाडू अडकले, तर त्यांच्या सरावावर, एकाग्रतेवर आणि एकूणच कारकिर्दीवर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे. एक तर कुस्ती क्षेत्रातील उत्तर भारतीय पदाधिकारी आणि पैलवान महाराष्ट्रातील पैलवानांवर कुरघोडी करण्याची एकही संधी सोडत नाहीत. त्यातच आपल्या पैलवानांच्या मनोबलाचे अशाप्रकारे खच्चीकरण झाले, तर महाराष्ट्राच्या कुस्तीवर संकटाचे सावट येईल. त्यामुळे इथल्या संघटनांबरोबरच सर्व खेळाडू, वस्ताद, प्रशिक्षक, संघटकांनी परस्परांमध्ये एकी ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

राज्याच्या कुस्ती क्षेत्राच्या व्यापक हितासाठी महाराष्ट्र केसरीचे ऐतिहासिक महत्त्व अबाधित राहिले पाहिजे. संघटनांतील वाद, राजकीय हस्तक्षेप आणि मीडिया ट्रायलमुळे कुस्तीपटूंना अडथळे निर्माण होणार नाहीत, याची खबरदारी सर्वांनीच घ्यायला हवी. ह्यमहाराष्ट्र केसरीह्वची गदा उंचावणे हा प्रत्येक पैलवानासाठी गौरवाचा क्षण असतो आणि त्यासाठी त्यांचा प्रवास निर्विवाद, पारदर्शक आणि न्याय्य असला पाहिजे. प्रशासनाने, संघटनांनी आणि राजकीय नेत्यांनी यामध्ये अनावश्यक हस्तक्षेप न करता फक्त खेळाडूंच्या उज्ज्वल भविष्यासाठी कार्य केले पाहिजे. तसे झाले तर कुस्तीपटूंच्या परिश्रमांमुळे ह्यमहाराष्ट्र केसरीह्वचा लौकिक तर उंचावेलच; शिवाय त्यातूनच गुणवत्ता असलेले पैलवान राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर राज्याचा दबदबा निर्माण करतील.

**(लेखक ज्येष्ठ कुस्ती संघटक आहेत.)**

महासागर
ग्लॅम वर्ल्ड
रविवार ■ दि. १६ फेब्रुवारी २०२५



# 'दबिडी दिबिडी' गाण्यावर बोलली उर्वशी रौतेला म्हणाली... मी असामान्य काय केले?

उर्वशी रौतेला नुकतीच दाक्षिणात्य चित्रपट 'डाकू महाराज' मध्ये दिसली. आता एका मुलाखतीत तिने चित्रपटातील 'दबिडी दिबिडी' या गाण्याबद्दल मत व्यक्त केले आहे.

ती म्हणाली की, ते सकारात्मकतेने घेतले जाईल असे तिला वाटते. पण लोकांच्या प्रतिक्रियेने ती स्वतः आश्चर्यचकित झाली. खरंतर, या गाण्यातील डान्स मूव्ह्सबद्दल सोशल मीडियावर बरीच टीका झाली.

हॉलिवूड रिपोर्टर इंडियाशी बोलताना उर्वशी म्हणाली की, 'दबिडी दिबिडी' हे गाणे खास नंदमुरी बालकृष्ण यांच्या चाहत्यांसाठी तयार करण्यात आले आहे. त्याचे बोलही त्याच्या विचारांनुसार लिहिलेले आहेत.

उर्वशी म्हणाली, 'जेव्हा तुम्ही माझ्या रिहर्सलचा व्हिडिओ पाहता तेव्हा सर्व काही खूप चांगले घडले.' हे अगदी कोणत्याही गाण्याला सामान्यतः कोरिओग्राफ केल्यासारखेच होते. मी मास्टर शेखर यांच्यासोबत काम करत होते, ज्यांच्यासोबत मी आधी तीनदा काम केले आहे. मी काहीही असामान्य केले नाही.

उर्वशी म्हणाली, 'रिहर्सल दरम्यान सर्वकाही परिपूर्ण आणि सोपे होते. पण खरं सांगायचं तर, सगळं इतक्या लवकर घडलं की लोक कोरिओग्राफीबद्दल असं का बोलत होते हे समजणं कठीण होतं. आम्हाला माहित नव्हते की ते अशा पद्धतीने घेतले जाईल, कारण रिहर्सलमध्ये सर्वकाही नियोजित प्रमाणे झाले. एक संघ म्हणून आम्हाला खरोखरच अशा प्रतिक्रियेची अपेक्षा नव्हती.

डाकू महाराज हा चित्रपट १२ जानेवारी रोजी प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात नंदमुरी बालकृष्ण, उर्वशी रौतेला, बॉबी देओल आणि दुलकर सलमान होते. या चित्रपटातील 'दबिडी दिबिडी' हे गाणे प्रदर्शित होताच, गाण्याचे कोरिओग्राफी आणि डान्स स्टेप्स पाहून अनेक युजर्स संतापले. ■ ■



# अंकिता लोखंडे विरुद्ध अभिनेत्री रोझलिनने केली केस

टीव्ही अभिनेत्री अंकिता लोखंडे विरोधात मानहानीचा खटला दाखल करण्यात आला आहे. तिच्याविरुद्ध अभिनेत्री रोझलिन खानने हा खटला दाखल केला आहे. रोझलिनने अंकितावर अंधेरी मॅजिस्ट्रेट कोर्टात अपमानास्पद आणि बदनामीकारक पोस्ट लिहिल्याबद्दल मानहानीचा खटला दाखल केला आहे.

अंकिता लोखंडेविरुद्ध अंधेरी मॅजिस्ट्रेट कोर्टात तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्यात, रोझलिनच्या वतीने असे म्हटले आहे - मिस अंकिता लोखंडे, जी एक सार्वजनिक व्यक्ती आहे. तिचे इंस्टाग्रामवर ५.४ दशलक्ष फॉलोअर्स आहेत. तिने रोझलिनला जाणूनबुजून लक्ष्य करून एक अपमानास्पद इंस्टाग्राम स्टोरी पोस्ट केली. तक्रारीत अंकिताच्या इंस्टाग्राम स्टोरीचे कॅप्शनही देण्यात आले आहे. 'कोणी इतका खाली कसा जाऊ शकतो?' अरे देवा....हे घृणास्पद आहे. मॅडम, तुमच्या माहितीसाठी, मी तुम्हाला सांगते की ही मुलगी हिना कर्करोगाशी खंबीरपणे लढत आहे. मी हे सांगू शकते कारण मला हे माहित आहे. काही दिवसांपूर्वी विकी हिनाला त्या रुग्णालयात भेटला होता जिथे ती केमोथेरपी घेत होती. रॉकीही तिथे उपस्थित होता. विकीने मला सांगितले की जेव्हा त्याने हिनाला पाहिले तेव्हा त्याच्या डोळ्यात अश्रू आले. हिनाने २८ जून २०२४ रोजी सोशल मीडियावर सांगितले होते की तिला स्टेज ३ ब्रेस्ट कॅन्सर आहे.

खरंतर, काही दिवसांपूर्वी रोझलिनने अभिनेत्री हिना खानवर गंभीर आरोप केले होते. रोझलिनने एका यूट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. मुलाखतीत ती हिनाच्या कर्करोगाबद्दल प्रश्न उपस्थित करताना दिसली. रोझलिन म्हणाली की हिनाने सांगितले की तिच्यावर सात ते आठ तासांची शस्त्रक्रिया होईल. ती कर्करोगाबद्दल जागरूकता पसरवण्याबद्दल बोलते पण आतापर्यंत तिने या सर्व गोष्टींबद्दल कोणतीही माहिती शेअर केलेली नाही. हिनाने अद्याप शस्त्रक्रियेचा प्रकार, केमोथेरपीमध्ये कोणते इंजेक्शन दिले गेले आणि रेडिएशनचा डोस याबद्दल काहीही उघड केलेले नाही. ती सोशल मीडियावर फक्त तिचे फॅन्सी फोटो शेअर करते.

■ ■

# वादग्रस्त युट्यूबर अपूर्वा आयफामध्ये येणार



इंडियाज गॉट लेटेंट या शोमध्ये तिच्या अपशब्दांमुळे आणि कमेंट्समुळे चर्चेत आलेली सोशल मीडिया इन्फ्लुएंसर अपूर्वा मखीजा २० फेब्रुवारी रोजी उदयपूरमध्ये येणार आहे. ती सिटी पॅलेस, अमारी घाट, पिचोला तलाव येथे आयफा शोसाठी व्हिडिओ शूट करेल आणि राजस्थानचे गुणगान गाताना दिसेल.

वाद असूनही, आयफा आयोजकांनी तिचे नाव यादीत कायम ठेवले आहे. १३ फेब्रुवारी रोजी कोटा येथे झालेल्या या शोमध्ये सहभागी झालेल्या अपूर्व माखीजा आणि इतर प्रभावकांवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपूर्वा मिझार्पूर मालिकेत गुड्डू पंडितची भूमिका साकारणाऱ्या अली फजलसोबत शूटिंग करणार आहे.

वाद निर्माण करणाऱ्या या शोचा भाग ८ फेब्रुवारी रोजी समय रैनाच्या चॅनलवर अपलोड करण्यात आला. तथापि, नंतर तो काढून टाकण्यात आला.

अपूर्वा माखिजाचे २७ लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत


पहिल्यांदाच, आयफा (इंटरनॅशनल इंडियन फिल्म अकादमी) पुरस्कार राजस्थानमध्ये आयोजित केले जाणार आहेत. पर्यटन विभागाच्या सहकार्याने हा कार्यक्रम ८ आणि ९ मार्च रोजी जयपूरमध्ये आयोजित केला जाईल. या मेगा इव्हेंटपूर्वी कार्यक्रमापूर्वी ट्रेझर हंट घेतला जात आहे.

अपूर्वा मखीजा आणि अली फजल हे देखील या कार्यक्रमाचा भाग आहेत. सोशल मीडिया इन्फ्लुएंसर अपूर्वा माखीजाचे इंस्टाग्रामवर २७ लाख फॉलोअर्स आहेत. तिने असंख्य कार्यक्रम आणि पॉडकास्टमध्ये भाग घेतला आहे. दोघेही २० फेब्रुवारी रोजी लेक सिटीला पोहोचतील.

उदयपूर व्यतिरिक्त, जैसलमेर, बिकानेर, जोधपूर, भरतपूर, कोटा आणि जयपूर शहरांची निवड प्री-इव्हेंट ट्रेझर हंटच्या शूटिंगसाठी करण्यात आली आहे.

याअंतर्गत, चित्रपट सेलिब्रिटी, कंटेंट क्रिएटर्स आणि इन्फ्लुएंसर यांनी ११ फेब्रुवारीपासून शूटिंग सुरू केले आहे.

इंडियाज गॉट टॅलेंट या शोमध्ये पालकांवर अश्लील टिप्पण्या केल्याबद्दल वकिलांनी युट्यूबर्स समय रैना, रणवीर अलाहाबादिया, आशिष चंचलानी आणि अपूर्वा मखीजा यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. वकिलांनी सांगितले की, विनोदाच्या नावाखाली समाजात अश्लीलता आणि अश्लीलता पसरवली जात आहे. ■



# मी चांगला चित्रपट बनवू शकलो नाही

अलिकडच्याच एका मुलाखतीत, दिग्दर्शक अनुभव सिन्हा यांनी त्यांच्या आणि शाहरुख खानच्या 'रा.वन' चित्रपटाच्या निर्मितीबद्दल आणि त्याच्या अपयशाचे कारण सांगितले. अनुभवचा असा विश्वास आहे की 'रा.वन' हा एक वाईट चित्रपट होता आणि म्हणूनच चित्रपटाला चांगली कामगिरी करता आली नाही. चित्रपटाची पटकथा आणि संपादनही वाईट होते.

मुलाखतीत अनुभव म्हणतात- 'मी २००५ मध्येच या चित्रपटाची कल्पना केली होती. आणि २००६ मध्ये मी तो लिहायला सुरुवात केली. अर्थात, मी शाहरुखशी चित्रपटाबद्दल बोलणी करत होतो, पण काहीही अंतिम झाले नाही. शाहरुखने बर्लिनमध्ये पत्रकार परिषदेत या प्रकल्पाची घोषणा केली आणि भारतासाठी विमानाने प्रवास केला. मला आठ तास सतत लोकांचे फोन येत राहिले. खरं सांगायचं तर, शाहरुखने असं काही म्हटलं आहे हे मला माहित नव्हतं आणि मला कसं उत्तर द्यावं हेही माहित नव्हतं. आठ तासांनंतर मी त्याच्याशी बोललो तेव्हा शाहरुख म्हणाला, 'आपण चित्रपट करत आहोत, त्यात लपवण्यासारखे काय आहे?'

'रा.वन' बद्दल बोलताना दिग्दर्शकाने सांगितले की त्या वेळी इंडस्ट्रीतील किती लोकांना हा चित्रपट अपयशी ठरू इच्छित होता. अनुभव म्हणतो- 'मला वाटतं की चित्रपटसृष्टीतील एक मोठा वर्ग शाहरुखला पडताना पाहू इच्छित होता. मी या इंडस्ट्रीत बऱ्याच काळापासून आहे आणि मी लोकांना चांगले ओळखतो. जेव्हा शाहरुखने चित्रपट फ्लॉप झाल्याचे कबूल केले तेव्हा मला खूप वाईट वाटले. मी चित्रपटात फसवणूक केली. त्याचा माझ्यावरील विश्वासही तुटला. मी शाहरुखला असा चित्रपट देऊ शकलो नाही ज्याचा त्याला अभिमान वाटेल.

अनुभव मुलाखतीत सांगतात की हा चित्रपट त्यांच्या विचारानुसार बनवला गेला नाही. पण त्यांना कधीही बजेटची चिंता करावी लागली नाही कारण शाहरुखने कधीही पैशांची चर्चा केली नाही. ती पैशापेक्षा खूप वरची गोष्ट आहे. तो एक अद्भुत व्यक्ति आहे. शाहरुखला याची अजिबात पर्वा नव्हती. चित्रपटाच्या बजेटबद्दल मी जे काही ऐकले ते बाहेरून होते. काही म्हणतात ९० कोटी रुपये, काही म्हणतात १२० कोटी रुपये. चित्रपटावरचा माझा ताबा सुटला होता. मी किंवा शाहरुखने असा चित्रपट कधीच बनवला नव्हता. आम्ही अनेक लोकांच्या मतांवर अवलंबून होतो. ■

# पुष्पासारखा चित्रपट बॉलीवूडच्या आवाक्यात नाही....



**चित्रपट निर्माते राम गोपाल वर्मा यांनी बॉलिवूड आणि साऊथ इंडस्ट्रीबद्दल प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, बॉलिवूड चित्रपट निर्माते पुष्पा २ सारखे चित्रपट बनवू शकत नाहीत, कारण त्यांच्याकडे अशा कल्पना नाहीत. पण दक्षिण भारतीय चित्रपट नेहमीच प्रेक्षकांना आवडतात, कारण त्यांची अनोखी कथा आणि सांस्कृतिक शैली बॉलीवूडपेक्षा खूप वेगळी आहे. राम गोपाल वर्मा म्हणाले की, बॉलिवूड दिग्दर्शक पुष्पा २ सारखे चित्रपट बनवू शकत नाहीत. ते सक्षम नाहीत असे नाही, पण त्यांचे विचार वेगळे आहेत.**

खरा फरक चित्रपट निर्मात्यांच्या विचारसरणीत आहे, प्रेक्षकांच्या निवडीत नाही. पूर्वीचे हिंदी चित्रपट अमिताभ बच्चन यांच्या चित्रपटांमध्ये दिसणारे मसाला चित्रपटांवर आधारित होते. 'मी अमिताभ बच्चन यांच्या काळातील म्हणजेच ७० आणि ८० च्या दशकाबद्दल बोलत आहे. तेव्हा दक्षिण चित्रपट उद्योग हिंदी चित्रपटांचे रिमेक बनवत असे. रजनीकांत बच्चन यांच्या चित्रपटांचे रिमेक बनवत असत. चिरंजीवी आणि एनटीआर सारखे स्टारही असेच करत होते. पण दक्षिणेकडील लोकांनी हिंदी चित्रपटाची कला शिकली.

काही काळानंतर, संगीत कंपन्या आल्या आणि संगीत उद्योगात मोठा बदल घडवून आणला. या कंपन्या त्यांची गाणी चित्रपटांमध्ये टाकण्यासाठी पैसे देऊ लागल्या. याचा परिणाम असा झाला की ॲक्शन चित्रपटांची संख्या कमी होऊ लागली आणि त्याच सुमारास अमिताभ बच्चन यांनी सुमारे पाच वर्षांचा मोठा ब्रेक घेतला.

'मैंने प्यार किया' आणि 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' सारख्या संगीतमय चित्रपटांकडे उद्योग वळू लागला आणि बॉलीवूड त्यांचे मसाला चित्रपट विसरू लागला. पण दक्षिणेकडील उद्योग कधीही बदलला नाही. त्यांनी ॲक्शन आणि मोठ्या प्रमाणात मनोरंजन करणारे चित्रपट बनवणे सुरू ठेवले.

राम गोपाल वर्मा म्हणाले, 'सुमारे १५-२० वर्षांपूर्वी बॉलिवूडमध्ये नवीन दिग्दर्शक आले, जे अधिक शहरी आणि पाश्चात्य विचारसरणीचे होते. ते इंग्रजी बोलत होते आणि वांद्रेसारख्या भागात राहत होते. त्यांचे विचार खूप वेगळे होते. तर दक्षिणेतील अनेक दिग्दर्शक अजूनही त्यांच्या संस्कृतीशी जोडलेले आहेत.

राम गोपाल वर्मा यांनी नुकताच त्यांचा नवीन चित्रपट 'सिंडिकेट' ची घोषणा केली आहे. त्यांनी स्वतः सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द्वारे याबद्दल माहिती दिली.

■ ■ ■

# आतापर्यंतचा सर्वात मोठा चित्रपट
# वेलकम टू द जंगल



अहमद खान, अनेक प्रतिभांनी युक्त अशी व्यक्ती आहे. ते प्रामुख्याने नृत्य नृत्यदिग्दर्शक म्हणून ओळखले जात होते, परंतु नंतर त्यांनी अनेक उत्तम चित्रपट दिग्दर्शित केले. अहमद खान या वर्षी 'वेलकम टू द जंगल' या मल्टीस्टारर चित्रपटातून पुनरागमन करत आहे.

या चित्रपटात बडी स्टारकास्ट आहे. या चित्रपटात अक्षय कुमार, सुनील शेट्टी, जॅकी श्रॉफ आणि रवीना टंडन यांच्यासह अनेक स्टार्स दिसणार आहेत. हा चित्रपट वेलकम मालिकेतील मागील दोन चित्रपटांपेक्षा पूर्णपणे वेगळा असेल.

अहमद खान या वर्षी 'बाप' हा आणखी एक चित्रपट घेऊन येत आहेत. त्यांनी झी स्टुडिओजच्या सहकार्याने हा चित्रपट बनवला आहे. या चित्रपटात संजय दत्त, सनी देओल, जॅकी श्रॉफ आणि मिथुन चक्रवर्ती दिसणार आहेत.

अहमद खान सांगतात, हा माझ्या कारकिदीर्तील सर्वात मोठा चित्रपट आहे. मला बाजूला ठेवा, तुम्ही याला हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात मोठा चित्रपट म्हणू शकता. या चित्रपटात ३४ कलाकारांची भूमिका आहे. निर्माते फिरोज नाडियाडवाला मला म्हणाले, अहमद, तू या चित्रपटात फक्त अशाच कलाकारांना कास्ट करावे ज्यांना लोक नावाने ओळखतात. असा एकही अभिनेता नसावा ज्याच्याबद्दल लोकांना सांगण्याची गरज असेल.

चित्रपटाच्या कास्टिंग दरम्यान सर्वात खास गोष्ट म्हणजे कोणत्याही अभिनेत्याने असे म्हटले नाही की तो चित्रपटात काम करणार नाही कारण इतर अनेक कलाकार आधीच त्यात काम करत होते. स्क्रीन टाइमबाबत कोणालाही असुरक्षितता नव्हती. अहमद खान यांनी रंगीला आणि किकसारख्या चित्रपटांमध्ये नृत्यदिग्दर्शनाचे प्रशिक्षण दिले आहे.

हा चित्रपट वेलकम (२००७) आणि वेलकम बॅक (२०१५) पेक्षा पूर्णपणे वेगळा असेल. फिरोज भाईंनी थेट सांगितले की यावेळी आपल्याला काहीतरी वेगळे आणि नवीन आणायचे आहे. मागच्या दोन चित्रपटांच्या पोस्टर्सवर नजर टाका, स्टारकास्ट काळ्या सूटमध्ये दिसत होती. यावेळी पोस्टर पहा. सर्व कलाकार आर्मीच्या पोशाखात दिसतील. यावेळी आम्ही 'सेना'वर आधारित चित्रपटाची थीम ठेवली आहे. जर तुम्ही त्याच्या नावातून 'वेलकम' काढून टाकले तर तो त्याच फ्रँचायझीचा चित्रपट आहे असे वाटणार नाही.

पुढे तो सांगतो, अनेक आव्हाने होती, पण सर्वकाही सहज घडले. कारण सर्व कलाकार त्यांच्या कामाचा आनंद घेत होते. प्रत्येकजण स्वतःला नवीन कलाकार असल्यासारखे सादर करत होता. मला असं वाटलं जणू मी विद्यार्थ्यांना शिकवत आहे. दिग्दर्शक म्हणून मला कोणतीही अडचण येऊ नये म्हणून ते हे जाणूनबुजून करत होते.

सध्या चित्रपटाचे २५ टक्के चित्रीकरण अजून बाकी आहे. आपण लवकरच दुबईला जाणार आहोत. हा चित्रपट वर्षाच्या अखेरीस प्रदर्शित होईल, असेही तो म्हणाला.

'बाप' चित्रपटाविषयी अहमद खान सांगतो की, या चित्रपटात सनी देओल, जॅकी श्रॉफ, मिथुन चक्रवर्ती आणि संजय दत्त ही चौकडी दिसणार आहे. या चित्रपटाची कल्पना मी दिली आहे. झी स्टुडिओजने यासाठी निधी दिला आहे तर विवेक चौहान दिग्दर्शन करत आहेत. चित्रपटात जबरदस्त ॲक्शन पाहायला मिळेल. हा असा चित्रपट आहे ज्याबद्दल दुसऱ्या कोणीतरी बनवताना हजार वेळा विचार केला असेल. चारही दिग्गजांना एकत्र आणणे हे स्वतःच एक आव्हान होते. तथापि, माझ्या एका फोन कॉलवर त्या चौघांनीही सहमती दर्शवली, याला त्यांची उदारता म्हणा. या वर्षाच्या अखेरीस ते प्रदर्शित करण्याची योजना आहे.

■ ■ ■